# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/02/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. अरोली :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा चोखाळा दिनांक १७/०२/२०२३ चे ००.०५ वा. ते ००.४० वा. दरम्यान अरोली पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन अरोली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन टाटा योद्धा मालवाहक वाहन क्र. एम. एच. ४० बी. जी. ३२६१ चा चालक आरोपी नामे— सजिद अहमद शकील अहमद, वय ३० वर्ष, रा. सैलाब नगर मज्जीद जवळ कामठी जि. नागपुर याचे वाहनाला बॅरीगेट लावुन थांबवुन त्याचे वाहन चेक केले असता त्या गाडीमध्ये ०४ लाल भुरकट व १० पांढरे भुरकट १४ गोवंश किंमती अंदाजे ९१,०००/—रूपयाचा मुद्देमाल व त्याच्या ताब्यातील टाटा योद्धा मालवाहक वाहन क्र. एम.एच. ४० बी. जी. ३२६१ किंमती अंदाजे ४,००,०००/—रू. असा एकुण वाहनासह ४,९१,०००/रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक महालकर ब नं. १९५९ यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ११ (१) (डी), प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि १९६०, सहकलम ५(अ) (१) (२) ९ महा. प्रा सं. का. १९९५ काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ८०६ उमेश इंगळे मो. क्र. ९९२३४६३४६१ हे करीत आहे.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर